दैनिक

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार...

आरएनआय : MAHMAR/2021/85884 | शनिवार, दि. ४ जुलै २०२६ | वर्ष - १ | अंक - २७८ | पाने - ४

पुणे/पिंपरी-चिंचवड


### आजचे पंचांग

दिनांक : ४ जुलै २०२६ वार : शनिवार माह (अमावस्यांत) : ज्येष्ठ माह (पूर्णिमांत) : आषाढ ऋतु : वर्षा आयन : दक्षिणायन पक्ष : कृष्ण पक्ष तिथी : चतुर्थी तिथी (दुपारी १२:३९ पर्यंत) त्यानंतर पंचमी तिथी नक्षत्र : धनिष्ठा नक्षत्र (दुपारी ०१:४३ पर्यंत) त्यानंतर शततारका नक्षत्र योग : प्रीति योग (सायंकाळी ०५:०० पर्यंत) त्यानंतर आयुष्मान योग करण : बलवा करण (दुपारी १२:३९ पर्यंत)

### तजमिनीचा बेकायदेशीरपणे ताबा घेऊन पिकांचे नुकसान

**पुणे :** ७५ वर्षांपासून तीन पिढ्यांपासून कसत असलेल्या जमिनीबाबत वाद निर्माण करुन जमिनीमध्ये अतिक्रमण करुन ट्रक्टरने मुळा, मका पिकावर नांगरुन पिकांचे तसेच पाण्याची पाईप लाईन तोडून नुकसान केल्याचा प्रकार कदम वाक वस्ती जवळील कवडीगाव येथे घडला आहे. याबाबत सविता दादासो झगडे (वय ५०, रा. कवडीगाव, कदमवाक वस्ती) यांनी लोणीकाळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यावरुन पोलिसांनी चित्तरंजन गायकवाड, गौरी गायकवाड, ओम गायकवाड, गौरी गायकवाड याचे भावाची बायको व १० ते १२ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.

## ‘लाडकी बहीण’चा जूनचा हप्ता रखडला; सरकारकडून अद्याप अधिकृत घोषणा नाही

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्य सरकारच्या महत्त्वाकांक्षी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजनेअंतर्गत जून महिन्याचा १,५०० रुपयांचा हप्ता अद्याप लाखो लाभार्थी महिलांच्या बँक खात्यात जमा झालेला नसल्याने राज्यभर संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. साधारणपणे प्रत्येक महिन्याच्या १० तारखेच्या आसपास जमा होणारी आर्थिक मदत यावेळी जुलैचा पहिला आठवडा सुरू होऊनही न मिळाल्याने लाभार्थी महिलांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, जून महिन्याचा थकीत हप्ता १५ जुलैपर्यंत जमा होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली तरी याबाबत राज्य सरकारकडून कोणतीही अधिकृत घोषणा किंवा स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही.

ही योजना राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांसाठी नियमित आर्थिक सहाय्याचा महत्त्वाचा आधार मानली जाते. अनेक महिला घरखर्च, मुलांचे शिक्षण, औषधोपचार आणि दैनंदिन गरजांसाठी या रकमेवर अवलंबून असल्याने हप्ता उशिरा मिळाल्याचा थेट परिणाम त्यांच्या आर्थिक नियोजनावर होत आहे. त्यामुळे पैसे नेमके कधी जमा होणार, याबाबत स्पष्ट माहिती नसल्याने लाभार्थी महिला वारंवार बँका, सरकारी कार्यालये आणि ऑनलाइन पोर्टलवर चौकशी करत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

सरकारी सूत्रांकडून १५ जुलैपर्यंत निधी वितरित होण्याची शक्यता व्यक्त केली जात असली तरी अधिकृत आदेश किंवा निवेदन




अद्याप प्रसिद्ध झालेले नाही. परिणामी सोशल मीडियावर विविध अफवा आणि अपुष्ट माहिती वेगाने पसरत असून, त्यातून संभ्रम अधिक वाढत आहे. याबाबत सरकारकडून वेळेत अधिकृत माहिती न दिल्यामुळे लाभार्थ्यांमध्ये अनिश्चिततेचे वातावरण निर्माण झाल्याची टीका होत आहे.

सरकारने ही योजना महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सुरू केली असून तिचा मोठ्या प्रमाणावर प्रचारही करण्यात आला होता. मात्र, नियमित लाभ देण्याच्या बाबतीत होणारा विलंब आणि त्याबाबत अधिकृत संवादाचा अभाव यामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर प्रश्न उपस्थित होत आहेत. लाभार्थ्यांना वेळेवर आर्थिक मदत मिळणे हा योजनेच्या विश्वासार्हतेचा महत्त्वाचा भाग मानला जातो. त्यामुळे जून महिन्याचा रखडलेला हप्ता नेमका कधी जमा होणार आणि विलंबामागील कारणे काय आहेत, याबाबत सरकारने स्पष्ट भूमिका मांडण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अधिकृत स्पष्टीकरण येईपर्यंत लाखो लाभार्थी महिलांची प्रतीक्षा मात्र कायम राहणार आहे.

## बनावट खतांवर धडक मोहीम; कसूर करणाऱ्या निरीक्षकांवरही फौजदारी कारवाईचा इशारा

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यात बनावट व निकृष्ट कृषी निविष्ठांची विक्री रोखण्यात यंत्रणा अपयशी ठरत असल्याची कबुलीच देणारे पाऊल उचलत कृषी विभागाने आता तालुकास्तरीय गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकांनाही थेट जबाबदार धरण्याचा निर्णय घेतला आहे. बनावट खतांच्या वाढत्या तक्रारी, तपासणीत उघड झालेल्या अनियमितता आणि आतापर्यंत १०४ गुन्हे दाखल झाल्यानंतर प्रशासनाने तपासणी अधिक कठोर करण्याची घोषणा केली आहे. यापुढे तपासणीत हलगर्जीपणा करणाऱ्या अधिकाऱ्यांवर केवळ प्रशासकीय कारवाईच नव्हे, तर आवश्यकतेनुसार फौजदारी गुन्हेही दाखल केले जाणार असल्याचा स्पष्ट इशारा कृषी आयुक्त सूरज मांढरे यांनी दिला आहे.

शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी राज्यभर विशेष गुणवत्ता नियंत्रण मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून तालुकास्तरीय कृषी अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यक्षेत्रातील खत, बियाणे आणि इतर कृषी निविष्ठा विक्री केंद्रांची दररोज प्रत्यक्ष तपासणी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. संशयास्पद नमुने तातडीने प्रयोगशाळेत पाठविणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच तपासणीच्या गुणवत्तेवर लक्ष ठेवण्यासाठी विभागीय स्तरावर भरारी पथके नियुक्त करण्यात आली असून ती अचानक फेरतपासणी करून निरीक्षकांच्या कामाचे मूल्यमापन करणार आहेत.

एखाद्या तालुक्यात वारंवार बनावट किंवा निकृष्ट कृषी निविष्ठांची विक्री होत असल्याचे आढळल्यास संबंधित गुणवत्ता नियंत्रण निरीक्षकाला थेट जबाबदार धरले जाणार आहे. अशा प्रकरणांत प्रशासकीय कारवाईसोबतच फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा प्रस्तावही सादर केला जाणार आहे.

## सारांश वृत्त

### महसूल प्रशासनाच्या दिरंगाईचा संताप; महिला शेतकऱ्याचा पुन्हा आत्महत्येचा प्रयत्न

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पैठण :** सातबारा उताऱ्यावरील कथित चुकीचा फेरफार रद्द करण्यासाठी वारंवार पाठपुरावा करूनही न्याय मिळत नसल्याच्या संतापातून पैठण तालुक्यातील एका महिला शेतकऱ्याने शुक्रवारी तहसील कार्यालयात पुन्हा आत्महत्येचा प्रयत्न केला. महिनाभराच्या कालावधीत दुसऱ्यांदा टोकाचे आंदोलन करण्याची वेळ आल्याने महसूल प्रशासनाच्या दिरंगाईवर आणि तक्रार निवारण यंत्रणेच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. पैठण तालुक्यातील ढोरकीन येथील शेतकरी शोभा बबन कुदळे यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या शेतीच्या सातबारावर चुकीच्या व्यक्तीच्या नावाने फेरफार करण्यात आला असून तो रद्द करण्यासाठी त्यांनी अनेक वेळा महसूल अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा केला. मात्र, दीर्घकाळ उलटूनही त्यांच्या मागणीवर ठोस निर्णय न झाल्याने त्यांनी पुन्हा आंदोलनाचा मार्ग स्वीकारला. शुक्रवारी तहसील कार्यालयात नागरिकांची मोठी वर्दळ असताना शोभा कुदळे यांनी तहसीलदार कार्यालयासमोरील भिंतीवर चढून विद्युत खांबाला साडी बांधत गळफास घेण्याचा प्रयत्न केला. हा प्रकार लक्षात येताच तहसील कार्यालयात एकच धावपळ उडाली. माहिती मिळताच पोलीस आणि महसूल अधिकारी घटनास्थळी पोहोचले. पोलिसांनी संयमाने संवाद साधत आणि समजूत काढत काही तासांच्या प्रयत्नानंतर त्यांना सुरक्षितपणे खाली उतरवले. यापूर्वीही सुमारे महिनाभरापूर्वी शोभा कुदळे यांनी तहसील कार्यालय परिसरातील पाण्याच्या टाकीवर चढून आंदोलन केले होते. त्या वेळीही प्रशासनाने आश्वासन देऊन आंदोलन मागे घ्यायला लावले होते. मात्र, त्यानंतरही प्रश्न निकाली न निघाल्याने पुन्हा त्याच स्वरूपाचे टोकाचे पाऊल उचलले गेल्याने केवळ आश्वासनांवर प्रश्न सुटत नसल्याचे स्पष्ट झाले आहे.

## पवना बंद जलवाहिनी’ प्रकल्पाला गती; मुख्यमंत्र्यांचा सकारात्मक प्रतिसाद



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पिंपरी-चिंचवडच्या दीर्घकालीन पाणीपुरवठ्यासाठी महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या ‘पवना बंद जलवाहिनी’ प्रकल्पाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. आमदार शंकर जगताप यांच्या पाठपुराव्यानंतर प्रकल्पासंदर्भात उच्चस्तरीय बैठक घेऊन पुढील निर्णय घेण्याचे संकेत देण्यात आले.

मुख्यमंत्र्यांनी प्रकल्प राबविताना मावळमधील शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, पुनर्वसन आणि प्रलंबित मागण्यांचा विचार करूनच पुढील कार्यवाही केली जाईल, अशी ग्वाही दिली. मावळ आणि पिंपरी-चिंचवड या दोन्ही भागांना समान न्याय देण्याची भूमिका सरकारने स्पष्ट केली.

आमदार शंकर जगताप यांनी हा प्रकल्प शहराच्या पुढील ३० वर्षांच्या जलसुरक्षेसाठी महत्त्वाचा असल्याचे सांगत, शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच प्रकल्प पूर्ण केला जाईल, असे म्हटले आहे.

## ईएसआय रुग्णालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा दावा; प्रत्यक्ष अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह कायम

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** राज्यातील कामगार विमा (ईएसआय) रुग्णालयांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून आरोग्यसेवा सक्षम करण्याचा सरकारचा दावा पुन्हा एकदा विधानपरिषदेत मांडण्यात आला. मात्र प्रत्यक्ष पायाभूत सुविधा, मनुष्यबळाची कमतरता आणि सेवा उपलब्धतेतील अडथळे यामुळे या घोषणांच्या अंमलबजावणीवर प्रश्नचिन्ह कायम असल्याचे चित्र दिसून आले.

सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी प्रश्नोत्तराच्या तासात सांगितले की, ईएसआय रुग्णालयांमध्ये आधुनिक वैद्यकीय सुविधा टप्प्याटप्प्याने उपलब्ध करून दिल्या जात असून, कामगारांना त्यांच्या परिसरातच उपचार मिळावेत यासाठी शासन प्रयत्नशील आहे. तथापि,



अनेक रुग्णालयांमध्ये अद्यापही मूलभूत वैद्यकीय साधनांची आणि तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता असल्याचे वास्तव समोर आहे.

विधानपरिषद सदस्य मनीषा कायंदे यांनी याबाबत प्रश्न उपस्थित केला, तर भाई जगताप, प्रसाद लाड आणि राजीव पोतदार यांनीही उपप्रश्नांद्वारे ईएसआय सेवांतील त्रुटींवर प्रकाश टाकला.

मंत्री आबिटकर यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही रुग्णालयांमध्ये एक्स-रे सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. रेडिओलॉजिस्टच्या कमतरतेमुळे एमबीबीएस डॉक्टरांना प्रशिक्षण देऊन सेवा सुरू करण्यात आल्या असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. मात्र तज्ज्ञांच्या अभावात निदान व उपचारांच्या गुणवत्तेबाबत चिंता व्यक्त होत आहे.

५० पेक्षा अधिक रुग्णसंख्या असलेल्या ईएसआय रुग्णालयांमध्ये सीटी स्कॅन आणि एमआरआय सुविधा उपलब्ध करून देण्याचा दावा करण्यात आला असला तरी, अनेक ठिकाणी ही यंत्रणा अद्याप कागदोपत्रीच असल्याचे आरोग्य क्षेत्रातील सूत्रांचे म्हणणे आहे.

ईएसआय योजनेअंतर्गत मोफत उपचार उपलब्ध असल्याचे सांगत सरकारकडून जनजागृतीची गरज व्यक्त करण्यात आली. मात्र लाभार्थ्यांपर्यंत ही माहिती आणि सुविधा प्रभावीपणे पोहोचत नसल्याची टीका सातत्याने होत आहे.

वैद्यकीय उपकरण खरेदी प्रक्रियेत पारदर्शकता ठेवण्याचे आश्वासन देण्यात आले असून, पीएसयू संस्थांच्या सहभागाचा विचार सकारात्मक पद्धतीने केला जाईल असेही स्पष्ट करण्यात आले. मात्र प्रत्यक्षात आरोग्यसेवेतील गती आणि गुणवत्तेतील अंतर भरून काढणे हेच सरकारसमोरचे मुख्य आव्हान असल्याचे दिसून येत आहे.

## ॲट्रॉसिटी कायद्याच्या गैरवापरावर सरकारची भूमिका; पाच जिल्ह्यांतील वाढत्या गुन्ह्यांची चौकशी



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक (ॲट्रॉसिटी) कायद्याचा गैरवापर होऊ नये, तसेच खोटे गुन्हे दाखल होणार नाहीत याची दक्षता घ्यावी, असे स्पष्ट निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य पोलिसांना दिले आहेत. त्याचबरोबर सोलापूर, अहिल्यानगर, परभणी, नांदेड आणि यवतमाळ या पाच जिल्ह्यांमध्ये ॲट्रॉसिटीचे गुन्हे तुलनेने अधिक का नोंदवले जात आहेत, यामागील कारणांचा सखोल अभ्यास करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत.

मुख्यमंत्र्यांनी कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करताना कोणत्याही पीडिताला न्यायापासून वंचित ठेवले जाणार नाही, याची खबरदारी घेण्यास सांगितले. त्याचवेळी, वैयक्तिक वाद, मालमत्ता किंवा इतर कारणांसाठी ॲट्रॉसिटी कायद्याचा गैरवापर होत असल्यास अशा प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून वस्तुस्थिती समोर आणावी, असेही निर्देश देण्यात आले.

राज्य सरकारच्या मते, संबंधित पाच जिल्ह्यांमध्ये गुन्ह्यांची संख्या वाढण्यामागील सामाजिक, प्रशासकीय आणि स्थानिक कारणांचा अभ्यास करून त्यानुसार प्रतिबंधात्मक उपाययोजना आखल्या जाणार आहेत. पोलिसांनी केवळ गुन्हे नोंदविण्यावर भर न देता त्यामागील कारणांचे विश्लेषण करून कायद्याचा योग्य वापर सुनिश्चित करावा, असेही बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

सरकारने यावर भर दिला की, ॲट्रॉसिटी कायद्याचा मूळ उद्देश अनुसूचित जाती-जमातींवरील अत्याचारांना आळा घालणे आणि पीडितांना तातडीने न्याय मिळवून देणे हा आहे. त्यामुळे निरपराध व्यक्तींवर खोटे गुन्हे दाखल होणार नाहीत आणि खऱ्या पीडितांनाही न्याय मिळेल, या दोन्ही बाबींचा समतोल राखणे आवश्यक असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अधोरेखित केले.

## भेसळीविरोधात एफडीएचा नवा बडगा; आता दूध साखळीवर मुंढेंचे लक्ष

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** हॉटेल, रेस्टॉरंट, पनीर आणि बेकरी व्यवसायांवरील धडक कारवाईनंतर राज्याच्या अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) आता दूध आणि दुग्धजन्य पदार्थांच्या संपूर्ण पुरवठा साखळीवर लक्ष केंद्रित केले आहे. राज्यभरातील तपासण्यांमध्ये दूध संकलनापासून ते ग्राहकांच्या ताटापर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर सातत्याने गंभीर त्रुटी आणि अन्न सुरक्षा नियमांचे उल्लंघन आढळत असल्याचा दावा करत आयुक्त तुकाराम मुंढे यांनी ‘फार्म टू प्लेट’ प्रणालीची कठोर अंमलबजावणी करण्याची घोषणा केली आहे. या निर्णयामुळे दूध उत्पादक, संकलन केंद्रे, प्रक्रिया उद्योग, वितरक आणि किरकोळ विक्रेते यांच्यावर अधिक कडक जबाबदाऱ्या येणार आहेत.

शुक्रवारी आयोजित पत्रकार परिषदेत मुंढे यांनी राज्यात ‘सेव्ह फूड, सेव्ह ड्रग’ ही व्यापक मोहीम सुरू करण्यात आल्याची माहिती दिली. नागरिकांच्या दैनंदिन आहारातील सर्वाधिक महत्त्वाचा घटक असलेल्या दुधाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. दूध उत्पादकांसोबत झालेल्या बैठकीत संपूर्ण पुरवठा साखळी अधिक पारदर्शक आणि सुरक्षित करण्यासाठी सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

नवीन आदेशानुसार दूध संकलन केंद्रे, शीतकरण केंद्रे, प्रक्रिया उद्योग, पॅकेजिंग यंत्रणा, वाहतूक व्यवस्था, घाऊक व किरकोळ विक्रेते तसेच पनीर,



खवा, लोणी, क्रीम, चीज आणि आइस्क्रीम उत्पादक व विक्रेते यांना अन्न सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. दुधातील भेसळ, कृत्रिम दूध, अस्वच्छ साठवणूक, तापमान नियंत्रणातील त्रुटी आणि स्वच्छतेच्या निकषांकडे दुर्लक्ष केल्यास कठोर कारवाईचा इशाराही प्रशासनाने दिला आहे.

मुंढे यांनी सांगितले की, राज्यभर राबविण्यात आलेल्या तपासण्या, नमुना विश्लेषणे आणि निरीक्षणांमधून दूध पुरवठा साखळीतील अनेक गंभीर त्रुटी सातत्याने समोर आल्या आहेत. या समस्या एखाद्या जिल्ह्यापुरत्या मर्यादित नसून राज्यभर जवळपास एकसारख्या स्वरूपाच्या असल्याने एकसमान आणि कठोर अनुपालन व्यवस्था आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे केवळ दोषी आढळलेल्या आस्थापनांवर कारवाई करण्याऐवजी संपूर्ण व्यवस्थेत शिस्त आणण्याचा प्रयत्न असल्याचा दावा प्रशासनाने केला आहे.

यापूर्वी हॉटेल आणि रेस्टॉरंट्सवरील विशेष मोहिमेदरम्यान अनेक आस्थापनांनी नियमांचे पालन केल्याचे दाखवण्यासाठी पेस्ट कंट्रोलची प्रमाणपत्रे सादर केली होती. मात्र प्रत्यक्ष तपासणीत काही ठिकाणी पेस्ट कंट्रोलच झाले नसल्याचे उघड झाल्यानंतर अशा आस्थापनांचे परवाने रद्द करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. केवळ कागदोपत्री प्रमाणपत्रे दाखवून चालणार नाही, प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे, अन्यथा परवाना रद्द करण्यात येईल, असा इशारा मुंढे यांनी पुन्हा दिला.

राज्य सरकारने जारी केलेल्या नव्या आदेशाचा उद्देश केवळ भेसळ रोखणे एवढाच नसून सार्वजनिक आरोग्याचे संरक्षण, प्रामाणिक व्यवसायांना प्रोत्साहन आणि आधुनिक अन्न सुरक्षा संस्कृती विकसित करणे असल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे. मात्र, या नियमांची प्रभावी अंमलबजावणी, नियमित तपासण्या, प्रयोगशाळांची क्षमता आणि दोषींवर वेळेत होणारी कारवाई यावरच या मोहिमेचे यश अवलंबून राहणार आहे. यापूर्वीही भेसळीविरोधी मोहिमा राबविण्यात आल्या असल्या तरी त्यांचे परिणाम दीर्घकाल टिकले नाहीत, अशी टीका होत आली आहे. त्यामुळे यावेळी कठोर आदेशांबरोबरच सातत्यपूर्ण अंमलबजावणी आणि पारदर्शक कारवाई होते का, याकडे ग्राहक, दूध उत्पादक आणि अन्न सुरक्षा क्षेत्रातील तज्ज्ञांचे लक्ष लागले आहे.

## संपादकीय

### श्रद्धा की फक्त मते?

भारतातील धार्मिक स्थळांचे आधुनिकीकरण, कॉरिडॉर प्रकल्प, आणि देवस्थान व्यवस्थापनातील वाढत्या आर्थिक उलाढाली यामुळे श्रद्धा आणि प्रशासन यांच्यातील सीमारेषा दिवसेंदिवस धूसर होत चालली आहे. मंदिरांच्या नावावर सुरू असलेल्या भव्य प्रकल्पांमागे पारदर्शकता किती आहे, हा प्रश्न आता केवळ राजकीय नाही तर सार्वजनिक हिताचा गंभीर मुद्दा बनला आहे.

ऑक्टोबर २०२२ मध्ये उज्जैन येथील सुमारे ८५० कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेल्या महाकाल लोक कॉरिडॉरचे उद्घाटन मोठ्या थाटामाटात झाले. मात्र अवघ्या सात महिन्यांत, मे २०२३ मध्ये सप्तर्षींच्या मूर्ती वादळी वाऱ्याने कोसळल्या. नंतर समोर आलेल्या अहवालांनुसार या संरचनांमध्ये वापरलेले साहित्य, विशेषतः ऋछ्झ (फायबर रिइनफोर्स्ड प्लास्टिक), आणि कंत्राटदारांच्या कामाच्या दर्जावर गंभीर प्रश्न उपस्थित झाले. ही घटना केवळ तांत्रिक अपयश नव्हे, तर सार्वजनिक निधीच्या वापरातील उत्तरदायित्वाच्या अभावाचे उदाहरण ठरली.

त्याच काळात केदारनाथ मंदिरातील २३० किलो सोन्याच्या वापराबाबत उठलेल्या वादानेही धार्मिक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह निर्माण केले. १२५ कोटी रुपयांच्या खर्चाने सोन्याचे पितळात रूपांतर झाल्याचा आरोप समोर आला, ज्यावर मंदिर समित्यांनी स्पष्टीकरण दिले असले तरी पारदर्शकतेचा मुद्दा कायम राहिला.

अयोध्येतील राम मंदिर प्रकल्पात जमीन व्यवहारांवर आलेल्या आरोपांनीही लक्ष वेधले. काही व्यवहारांमध्ये काही मिनिटांतच मूल्यवाढ झाल्याचे आरोप समोर आले, ज्यामुळे धार्मिक प्रकल्पांतील आर्थिक व्यवहारांवर देखरेख किती प्रभावी आहे, हा प्रश्न उपस्थित झाला.

तिरुपती बालाजी मंदिरातील प्रसादात भेसळयुक्त तूप व प्राणिजन्य घटक आढळल्याचा दावा करणाऱ्या अहवालांनी देशभर संताप निर्माण केला. अशा संवेदनशील प्रकरणांमध्ये तपास यंत्रणांची प्रतिक्रिया आणि वेळेत कारवाई न होणे, हेही तितकेच गंभीर मानले जाते.

काशी विश्वनाथ धाम कॉरिडॉर प्रकल्पाने वाराणसीच्या परिसराचा कायापालट केला, परंतु त्याच वेळी काही प्राचीन संरचनांच्या नाशाचे आरोपही झाले. ओडिशातील पुरी जगन्नाथ मंदिर परिसरातील विकास कामे आणि 'रत्न भांडार'च्या चाव्यांचा मुद्दा यामुळे मंदिर व्यवस्थापनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित झाले.

चारधाम रस्ता प्रकल्पामुळे पर्यटन आणि तीर्थयात्रा सुलभ झाली असली तरी पर्यावरणीय परिणाम, भूस्खलन आणि जोशीमठसारख्या शहरांतील संकटांनी विकासाच्या मॉडेलवर प्रश्नचिन्ह उभे केले. विकास आणि पर्यावरण यांचा समतोल साधण्यात प्रशासन कमी पडल्याचे आरोप सातत्याने होत आहेत.

गुजरातमधील अंबाजी मंदिरातील प्रसाद बदल आणि भेसळीच्या आरोपांनी तर स्थानिक स्तरावरील व्यवस्थापनातील त्रुटी समोर आणल्या.

या सर्व घटनांचा एकत्रित विचार केला तर प्रश्न केवळ एका प्रकल्पाचा किंवा एका राज्याचा राहत नाही. तो अधिक व्यापक आहेधार्मिक श्रद्धेचा वापर राजकीय प्रभाव, आर्थिक व्यवहार आणि जनमत घडवण्यासाठी केला जातो का? धार्मिक स्थळांचे आधुनिकीकरण आवश्यक आहे, परंतु त्याचबरोबर पारदर्शकता, वैज्ञानिक देखरेख, स्वतंत्र ऑडिट आणि सार्वजनिक उत्तरदायित्वही तितकेच आवश्यक आहे. अन्यथा श्रद्धा ही केवळ भावनात्मक भांडवल बनते आणि त्यावर आधारित निर्णय लोकशाहीतील मतांमध्ये रूपांतरित होतात.

आजचा मुख्य प्रश्न हाच आहेश्रद्धा ही सेवा आणि शुद्धतेसाठी आहे, की ती फक्त निवडणुकीतील मतांपर्यंत मर्यादित राहिली आहे?

## संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांचे १९५ व्या आषाढी वारी-२०२६ पालखी प्रस्थान सोहळा अनुषंगाने पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांचेकडून पालखी मार्गाची पाहणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज यांची १९५ वी आषाढी वारी-२०२६ हा पालखी प्रस्थान सोहळा दिनांक ०८.०७.२०२६ रोजी नियोजित असून सदर आषाढी वारी व पालखी सोहळा शांततेने व निर्विघ्नपणे पार पाडण्याचे अनुषंगाने श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांनी आज दि.०३.०७.२०२६ रोजी श्री. क्षेत्र आळंदी येथील मंदीर परिसर व संपुर्ण पालखी मार्गाची पाहणी केली.

श्री. क्षेत्र आळंदी येथील मुख्य मंदीर व परिसर पाहणी दरम्यान संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे कार्यालयास भेट दिली. संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थान कमिटीचे प्रमुख विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे, विश्वस्त श्री. चैतन्य केशवराव लोंढे (कबीरबुवा), विश्वस्त व पालखी सोहळा प्रमुख ॲड. राजेंद्र उमाप, विश्वस्त योगी निरंजननाथ गुरु शांतिनाथ, श्री. चैतन्य लोंढे व इतर यांचेशी चर्चा केली. यावेळी पालखी सोहळ्यादरम्यान येणाऱ्या अडचणींसंबंधी माहिती घेवून गर्दीचे व्यवस्थापन, कायदा व सुव्यवस्था दृष्टीने कोणतीही अनुचित घटना घडु नये तसेच आषाढी वारी व पालखी सोहळयात सहभागी होणाऱ्या सर्व वारकऱ्यांना सुरक्षित व शांततेच्या मार्गाने संपुर्ण सोहळा भक्तीमय वातावरणात सर्वांचे सहकार्य व समन्वयाने पार पाडला जाईल याबाबत मा. पोलीस आयुक्त यांनी आश्वस्त केले. मा. पोलीस आयुक्त यांनी नव्याने तयार करण्यात येणाऱ्या पालखी रथाची पाहणी केली. संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज मंदीर व परिसरात दर्शनबारी दरम्यान होणाऱ्या गर्दीचे नियंत्रणासाठी रस्सी तसेच योग्यप्रकारे बॅरीकेटींगचा वापर करणे बाबत सुचना संबंधित अधिकारी यांना दिल्या. संतश्रेष्ठ श्री. ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे वतीने श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त पिंपरी चिंचवड व इतर वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचा सत्कार करण्यात आला.



मा. पोलीस आयुक्त यांनी पालखी मार्गावरील विसाव्याची ठिकाणे थोरल्या पादुका मंदीर व मॅग्झीन चौक, भोसरी फाटा येथे भेट देवून पाहणी केली. थोरल्या पादुका मंदीर येथे प्रवेशद्वर व दर्शनबारीचे ठिकाणी योग्य प्रकारे बॅरीकेटींग करुन गर्दी नियंत्रणाच्या अनुषंगाने खबरदारी घेणे बाबत सुचना संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आल्या. थोरल्या पादुका मंदीर परिसरातील बीआरटी मार्ग बंद ठेवून डेडीकेटेड एकल मार्ग चालु ठेवून वाहतुक /रहदारीचा पालखी मार्गात अडथळा होणार नाही याची दक्षता घेणे बाबत निर्देश संबंधित पोलीस अधिकारी यांना दिले. पालखी मार्गात अडथळा ठरणाऱ्या झाडांच्या फांदया काढुन टाकणे, पालखी मार्गावरील अडथळा ठरणारे कमानी काढुन टाकणे याबाबत सुचना देण्यात आल्या. मॅग्झीन चौक, भोसरी फाटा येथे विसाव्याचे ठिकाणी पालखी रथाकरीता उभारण्यात आलेल्या मंडपाची पाहणी केली. तसेच सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारे डी.जे. / डॉल्बी यांना परवानगी देण्यात येवू नयें. जर विनापरवाना कोणी डी. जे. डॉल्बी लावलेच तर त्यांचेवर योग्य ती कडक कारवाई करण्याचे निर्देश संबंधित पोलीस अधिकारी यांना दिले. सदर ठिकाणी केवळ पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत उभारण्यात येणाऱ्या स्वागत मंडपामध्येच उद्घोषणेकरीता स्पीकर चालु राहील याची दक्षता घ्यावी अशा सुचना संबंधितांना दिल्या.

सदर वेळी पोलीस विभागाचे श्री. विनय कुमार चौबे, पोलीस आयुक्त यांचेसह डॉ. शशिकांत महावरकर, पोलीस सह आयुक्त, श्री. सारंग आवाड, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. बसवराज तेली, अपर पोलीस आयुक्त, प्रादेशिक विभाग, श्री. मारुती जगताप, पोलीस उप आयुक्त परिमंडळ ३, श्री. रोहीदास पवार, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री. धीरज पाटील, पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, श्री. विक्रांत देशमुख, पोलीस उप आयुक्त, वाहतुक शाखा, तसेच आळंदी येथील भेटी दरम्यान आळंदी नगर परिषदेतर्फे श्री. माधव खांडेकर, मुख्याधिकारी, आळंदी नगर परिषद व श्री. प्रशांत कुऱ्हाडे, नगराध्यक्ष, आळंदी नगरपरिषद हे हजर होते.

## पिंपरी-चिंचवडमध्ये 'बंजारा भवन' उभारणी व सायन्स पार्कला वसंतराव नाईक यांचे नाव देण्याची गोरसेनेची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** आकाश कांबळे) - गोरसेना संघटनेच्या वतीने पिंपरी-चिंचवड शहरातील बंजारा समाजाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक विकासाच्या दृष्टीने दोन महत्त्वपूर्ण मागण्या करण्यात आल्या आहेत. यासंदर्भातील सविस्तर निवेदन महानगरपालिका प्रशासनाला प्रत्यक्ष भेटून सादर करण्यात आले.



निवेदनानुसार, शहरातील लाखो बंजारा बांधवांना सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यक्रम एकत्रितपणे साजरे करता यावेत, तसेच समाजासाठी कायमस्वरूपी व्यासपीठ उपलब्ध व्हावे, यासाठी पिंपरी-चिंचवड शहरात भव्य 'बंजारा भवन' (समाज मंदिर) उभारण्यात यावे, अशी प्रमुख मागणी करण्यात आली.

तसेच, चिंचवड येथील सायन्स पार्कला महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि हरितक्रांतीचे प्रणेते स्व. वसंतराव नाईक यांचे नाव देण्यात यावे, अशी दुसरी महत्त्वाची मागणीही निवेदनातून करण्यात आली.

गोरसेना पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष नितीन किसन चव्हाण यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने हे निवेदन पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे मुख्य प्रशासक तथा महापौर रवी लांडगे आणि महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना सादर केले. यावेळी महापालिकेचे जनता संपर्क अधिकारी (झठज) प्रफुल्ल पुराणिक उपस्थित होते.

गोरसेनेच्या प्रतिनिधींनी या दोन्ही मागण्या बंजारा समाजाच्या सांस्कृतिक ओळखीचे जतन आणि समाजहिताच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असल्याचे सांगत, महानगरपालिकेने त्याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली.

## आषाढी पालखी सोहळ्यापूर्वी पालखी मार्गाची पाहणी; वारकऱ्यांसाठी सुविधांवर भर



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** आषाढी पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवडचे महापौर रवि लांडगे यांनी शुक्रवारी मॅगझीन चौक ते भक्ती-शक्ती चौक परिसरातील पालखी मार्गाची पाहणी केली. वारकऱ्यांना सुरक्षित, स्वच्छ आणि सुलभ सुविधा उपलब्ध करून देण्याच्या सूचना त्यांनी संबंधित विभागांना दिल्या.

यावेळी स्वच्छता, पिण्याचे पाणी, चलत शौचालये, आरोग्य पथके, रुग्णवाहिका, अग्निशमन यंत्रणा, वाहतूक नियोजन, प्रकाश व्यवस्था आणि दिशादर्शक फलकांची तपासणी करण्यात आली. वारकऱ्यांच्या सुरक्षेसाठी मार्गावर टेहळणी टॉवर उभारण्याचे निर्देशही महापौरांनी दिले. पाहणीवेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त, विविध विभागांचे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते.

## पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पावर धरणग्रस्तांच्या मागण्या; मुख्यमंत्र्यांसमोरील बैठकीत मांडणार असल्याचे महापौरांचे आश्वासन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** पिंपरी-चिंचवड शहराच्या पाणीपुरवठ्यासाठी प्रस्तावित पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पावरून सुरू असलेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर महापौर रवी लांडगे यांनी गुरुवारी पवना धरणग्रस्त संघटना, जमीन हक्क परिषद आणि पवना बंदिस्त जलवाहिनी विरोधी कृती समितीच्या प्रतिनिधींशी चर्चा केली. या बैठकीत धरणग्रस्तांनी प्रकल्पाबाबतच्या हरकती, पुनर्वसनाचे प्रश्न आणि विविध मागण्या मांडल्या.

महापौर कार्यालयात झालेल्या बैठकीत प्रतिनिधींनी प्रकल्पामुळे प्रभावित होणाऱ्या नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण, पुनर्वसन, भरपाई आणि स्थानिकांच्या भावना यांचा विचार करण्याची मागणी केली. त्यानंतर महापौर रवी लांडगे यांनी धरणग्रस्तांच्या प्रतिनिधींसह महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांची भेट घेऊन या मुद्द्यांवर चर्चा केली.



बैठकीनंतर महापौरांनी धरणग्रस्त प्रतिनिधींना सांगितले की, मुंबई येथे मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या बैठकीत त्यांच्या सर्व मागण्या आणि आक्षेप मांडण्यात येतील. विकासकामे आणि प्रकल्पग्रस्तांचे हित यामध्ये समतोल साधण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.

दरम्यान, पवना बंदिस्त जलवाहिनी प्रकल्पाला धरणग्रस्त आणि स्थानिक ग्रामस्थांचा काही काळापासून विरोध असून पुनर्वसन, भरपाई आणि प्रकल्पाच्या अंमलबजावणीबाबत विविध प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री स्तरावरील बैठकीत या प्रश्नांवर कोणता निर्णय होतो, याकडे धरणग्रस्तांसह पिंपरी-चिंचवड शहराचेही लक्ष लागले आहे.

या बैठकीस पवना बंदिस्त जलवाहिनी विरोधी कृती समिती, पवना धरणग्रस्त संघटना, जमीन हक्क परिषद तसेच विविध शेतकरी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

## इंद्रायणी नदी वॉटर बॉडी सरोवर पुनर्जीवन प्रकल्प या सुमारे ४४३ कोटी रुपयांच्या कामावर गंभीर आक्षेप

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी-चिंचवड :** इंद्रायणी नदी वॉटर बॉडी सरोवर पुनर्जीवन प्रकल्प या सुमारे ४४३ कोटी रुपयांच्या कामावर गंभीर आक्षेप नोंदवण्यात आले आहेत. हा प्रकल्प नदी सुधारासाठी आहे की अधिकारी, राजकीय नेते व ठेकेदारांच्या हितासाठी, असा थेट सवाल पर्यावरण अभ्यासक व सामाजिक कार्यकर्त्यांनी उपस्थित केला आहे.



पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला उद्देशून करण्यात आलेल्या निवेदनात इंद्रायणी, पवना आणि मुळा या नद्यांच्या पुनर्जीवन प्रकल्पांवर एकूण सुमारे ७,५०० कोटी रुपयांचा खर्च प्रस्तावित असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. मात्र या प्रकल्पांमुळे प्रत्यक्षात नदीपात्रातील जैवविविधतेचा ऱ्हास, वृक्षतोड आणि नदीपात्र अरुंद होण्यासारखे परिणाम होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### पूरनियंत्रणाऐवजी सुशोभीकरण प्रकल्प – आरोप

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डीपीआरनुसार हे प्रकल्प पूरनियंत्रणात फारसा प्रभावी ठरणार नाहीत. प्रत्यक्षात केवळ सुशोभीकरण व सिव्हिल कामांवर भर दिला जात असून, नदीच्या मूळ पर्यावरणीय समस्यांकडे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

### बांधकाम हितसंबंधांचा आरोप

राज्य सरकारच्या धोरणात्मक चर्चांनंतर नदीकाठच्या जागेचा विकासासाठी वापर, टीडीआर-एफएसआय, गार्डन व बांधकाम प्रकल्पांसाठी वापर होण्याची शक्यता असल्याचे नमूद करत, या प्रकल्पांमागे विकासाच्या नावाखाली व्यावसायिक हितसंबंध असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

### टीडीआर-एफएसआय आणि एसटीपी प्रकल्पांवर प्रश्न

शहरातील सांडपाणी प्रक्रिया (एसटीपी) सुविधांवरही गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. सध्या आवश्यक क्षमतेच्या तुलनेत अपुरी प्रक्रिया क्षमता असल्याचा दावा करत, अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये एसटीपी कार्यान्वित नसल्याने प्रदूषित पाणी थेट नद्यांमध्ये मिसळत असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

### निविदा प्रक्रियेवर आक्षेप

इंद्रायणी नदी पुनर्जीवन प्रकल्पाच्या सुमारे ४४३ कोटी रुपयांच्या निविदा प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोपही करण्यात आला आहे. आठपैकी पाच स्थानिक ठेकेदारांना अपात्र ठरवून एका गुजरातस्थित कंपनीला निविदा दिल्याचा दावा करत, ही प्रक्रिया संशयास्पद असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच स्थायी समिती बैठकीत हा विषय ऐनवेळचा म्हणून समाविष्ट करून तातडीने मंजुरी देण्यात आल्याचा आरोप करत, प्रक्रिया अपारदर्शक असल्याचे सांगण्यात आले आहे.

### पर्यावरणीय परिणामांवर चिंता

नदीपात्रातील वृक्षतोड, जैवविविधतेचा ऱ्हास आणि धार्मिक-ऐतिहासिक महत्त्व असलेल्या आळंदी-देहू परिसरातील नदीच्या स्वरूपात होणारे बदल याबाबत तीव्र चिंता व्यक्त करण्यात आली आहे.

### प्रकल्प स्थगितीची मागणी

या पार्श्वभूमीवर संपूर्ण नदी पुनर्जीवन प्रकल्पास स्थगिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. त्याऐवजी शहरातील सर्व नद्यांमध्ये प्रभावी सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प (एसटीपी) उभारण्यावर प्राधान्य द्यावे, अशी भूमिका मांडण्यात आली आहे.

दरम्यान, या आरोपांवर महापालिका प्रशासन किंवा संबंधित अधिकाऱ्यांकडून अधिकृत प्रतिक्रिया अद्याप आलेली नाही.

## पिंपरी-चिंचवड महापालिका शाळांतील १,२८० विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांचा तुटवडा; तातडीने पुरवठ्याची मागणी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पिंपरी :** पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आणि आकांक्षा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने चालविण्यात येणाऱ्या इंग्रजी माध्यमाच्या शाळांतील सुमारे १,२८० विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष सुरू होऊन १५ दिवसांहून अधिक कालावधी उलटूनही पाठ्यपुस्तके मिळालेली नाहीत. या पार्श्वभूमीवर तातडीने पाठ्यपुस्तके उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

महापालिका व आकांक्षा फाउंडेशन यांच्या माध्यमातून २०१३ पासून कै. अनुसया नामदेव वाघेरे इंग्लिश मिडियम शाळा, कै. दत्तोबा रामचंद्र काळे इंग्लिश मिडियम शाळा आणि पीसीएमसी बोपखेल इंग्लिश मिडियम शाळांमध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरजू विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण दिले जाते. या शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता आणि निकालांच्या दृष्टीने सातत्याने चांगली कामगिरी केल्याचे सांगण्यात येते. मात्र, यंदा शाळा सुरू होऊन दोन आठवडे उलटूनही विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके न मिळाल्याने अध्यापन प्रक्रियेवर परिणाम होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मागील वर्षीदेखील अशाच प्रकारचा विलंब झाल्याचे शाळा व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. या पार्श्वभूमीवर संबंधित विभागाने तातडीने सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तके उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच वेळेत मागणी असूनही पुरवठा न झाल्यास जबाबदारी निश्चित करून आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला प्राधान्य देत भविष्यात अशा विलंबाची पुनरावृत्ती होऊ नये, यासाठी प्रशासनाने योग्य नियोजन करावे, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली आहे.

**दैनिक राज्य लोकतंत्र** हे पत्र मुद्रक, प्रकाशक मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स ॲण्ड सेल्स कॉर्पोरेशन सुमतीनगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक, कॅनाल रोड, बीड, ता.जि. बीड, ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक** - सीमा मस्के (मोकाशे) । **कार्यकारी संपादक** - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. EMAIL- RAJYALOKTANTRA@GMAIL.COM NO.L SB/BEED RNP-206/2024-26

## सारांश वृत्त

### एरोमॉलमध्ये व्यवस्था; तरीही विमानतळ परिसरात बेकायदा पार्किंग

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** पुणे विमानतळासाठी एरोमॉलमधील बहुमजली वाहनतळाची सुविधा उपलब्ध आहे. तरीही ओला, उबेर कंपन्यांचे कॅबचालक विमानतळ परिसरातील रस्त्यांवरच वाहने उभी करत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे विमानतळ परिसरात वाहतूक कोंडीची समस्या गंभीर बनली आहे. विमानतळाच्या प्रवेश आणि निर्गमन मार्गांवर वाहनांच्या रांगा लागत असून प्रवाशांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. त्यामुळे विमानतळ प्रशासनाने कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. विमानतळ प्राधिकरणाने कॅबसाठी एरोमॉलमधील मल्टी-लेव्हल पार्किंगची व्यवस्था केली आहे. अनेक चालक तेथे वाहने न लावता परिसरातील रस्त्यांवर थांबतात. त्यामुळे विशेषत: सकाळी आणि रात्रीच्या गर्दीच्या वेळी विमानतळ परिसरात वाहतुकीचा खोळंबा होत आहे. अनेक कॅबचालक ॲपवर दाखवलेले भाडे स्वीकारण्यास नकार देत असून अतिरिक्त रक्कम किंवा मीटरप्रमाणे भाड्याची मागणी करत आहेत. प्रवाशांनी नकार दिल्यास प्रवास रद्द करण्याचे प्रकार वाढले आहेत. त्यामुळे विमानतळावर येणाऱ्या आणि जाणाऱ्या प्रवाशांना दुहेरी त्रास सहन करावा लागत आहे. ओला आणि उबेरसारख्या कंपन्यांनी अतिरिक्त पैसे मागू नयेत, अशा सूचना चालकांना दिल्या असल्या तरी प्रत्यक्षात नियमांचे उल्लंघन सुरूच असल्याचे चित्र आहे. त्यामुळे वाहतूक पोलिस, विमानतळ प्रशासन आणि आरटीओने संयुक्त कारवाई करून बेकायदा पार्किंग व अतिरिक्त भाडे वसुलीला आळा घालावा, अशी मागणी प्रवाशांकडून होत आहे.

### पुण्यात पालखी मुक्कामात पाणी कपात रद्द

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालख्यांचे पुण्यात आगमन होत असून, या सोहळ्यासाठी पुणे महापालिका सज्ज झाली आहे. पालखी पुण्यातून बाहेर पडेपर्यंत शहरातील पाणी कपात पूर्णपणे रद्द करण्यात आली आहे, अशी घोषणा पुण्याचे महापौर मंजुषा नागपुरे यांनी केली. वारीच्या काळात वारकऱ्यांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी महापालिकेने विविध उपाययोजना आणि विशेष उपक्रम हाती घेतले आहेत. यंदा महापालिकेतर्फे 'सेवा वारी' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून वारकऱ्यांच्या सेवेसाठी आणि विविध सामाजिक संदेश देण्यासाठी पुणे शहरातील तब्बल साडेचार लाख विद्यार्थी एकत्र येणार आहेत.

# आंबेगावात ४०० कोटींचा रस्ता; तरीही खड्ड्यांतूनच प्रवास!

## अवसरी फाटा-जांबुत रस्त्याच्या संथ कामामुळे नागरिक त्रस्त

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**लोणी-धामणी :** आंबेगाव तालुक्यातील अवसरी फाटा ते जांबुत-शिक्रापूर या मार्गावरील सुमारे ४०० कोटी रुपयांच्या सिमेंट काँक्रीट रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू आहे. मात्र, कामाच्या अत्यंत संथ गतीमुळे रस्त्याची दुरवस्था झाली असून अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने नागरिकांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर माजी सहकार मंत्री तथा आमदार दिलीप वळसे पाटील यांनी या कामाकडे गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सिमेंट काँक्रीट रस्त्याच्या कामासाठी जुना डांबरी रस्ता उखडण्यात आला आहे. मात्र, अनेक ठिकाणी खोदकाम करून रस्ता अपूर्ण अवस्थेतच सोडण्यात आल्याने पावसाचे पाणी खड्ड्यांमध्ये साचत आहे. त्यामुळे वाहनचालकांना खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने लहान-मोठे अपघात घडत आहेत. रस्त्यात खड्डा की खड्ड्यात रस्ता? असा संतप्त सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



या मार्गावरून दररोज शालेय विद्यार्थी, कामगार, शेतकरी तसेच इतर प्रवासी मोठ्या संख्येने प्रवास करतात. आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील अनेक गावांचा मंचरशी संपर्क याच मार्गावरून असल्याने येथे दिवसभर मोठी वाहतूक असते. मात्र, काम सुरू असलेल्या ठिकाणी आवश्यक इशारा फलक, सुरक्षिततेची उपाययोजना आणि वाहतूक नियोजनाचा अभाव असल्याची तक्रार नागरिकांनी केली आहे.

* ४०० कोटींच्या रस्त्याचे काम संथ गतीने सुरू.
* पावसामुळे खड्ड्यांत पाणी; अपघातांचा धोका वाढला.
* इशारा फलक व वाहतूक व्यवस्थेचा अभाव.
* अधिकाऱ्यांच्या देखरेखीवर नागरिकांचा प्रश्न.
* कथित अल्पवयीन मजुरांबाबत चौकशीची मागणी.

रस्त्याच्या कामावर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडून पुरेशी देखरेख होत नसल्याचा आरोपही नागरिकांनी केला आहे. अधिकारी आणि ठेकेदार यांच्या कार्यपद्धतीबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत असून, कामावर अल्पवयीन मुली व महिलांकडून काम करून घेतले जात असल्याचाही दावा काही नागरिकांनी केला आहे. या आरोपांची संबंधित प्रशासनाने तातडीने चौकशी करून आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी स्थानिकांकडून होत आहे.

## संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथे भाविकांची गर्दी

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** संकष्टी चतुर्थीनिमित्त श्रीक्षेत्र वडगाव काशिंबेग येथील स्वयंभू मोरया अर्धपीठ गणपती मंदिरात शुक्रवारी भाविकांनी मोठ्या संख्येने दर्शन घेतले. पावसाच्या हलक्या सरींमध्येही भक्तांचा उत्साह कायम राहिला.

पहाटे महापूजेनंतर दिवसभर विविध धार्मिक विधी पार पडले. दुपारी महाआरती आणि सायंकाळी मुख्य आरती संपन्न झाली. दिवसभर 'गणपती बाप्पा मोरया'च्या जयघोषाने परिसर दुमदुमला.



भाविकांसाठी खिचडी प्रसाद, पिण्याच्या पाण्याची तसेच निवाऱ्याची व्यवस्था करण्यात आली होती. पावसामुळे थोड्या अडचणी निर्माण झाल्या असल्या तरी भाविकांची गर्दी कायम राहिली. मंदिर परिसरात यात्रेचे स्वरूप निर्माण झाले होते. देवस्थान ट्रस्टने संपूर्ण व्यवस्थेचे नियोजन केले.

## मतदार यादीतील त्रुटी टाळण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे; प्रशासनाचे आवाहन

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मंचर :** मतदार यादी अचूक, अद्ययावत आणि त्रुटीमुक्त करण्यासाठी सुरू असलेल्या विशेष पुनरिक्षण मोहिमेत नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून प्रशासनाला आवश्यक सहकार्य करावे, असे आवाहन प्रांताधिकारी अर्चना तांबे यांनी केले.

मंचर येथे आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या. तांबे यांनी सांगितले की, भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राज्यभर विशेष पुनरिक्षण मोहीम राबविण्यात येत असून, नियुक्त अधिकारी व कर्मचारी घरोघरी जाऊन मतदारांची माहिती पडताळून पाहत आहेत. या प्रक्रियेत नव्या पात्र मतदारांची नोंदणी, नाव, पत्ता व इतर तपशीलांतील दुरुस्ती, तसेच मृत किंवा कायमस्वरूपी स्थलांतरित मतदारांची नावे अद्ययावत करण्याचे काम सुरू आहे.

मतदार यादीतील अचूकता ही मुक्त, निष्पक्ष आणि विश्वासार्ह निवडणूक प्रक्रियेचा महत्त्वाचा आधार असल्याचे नमूद करत तांबे म्हणाल्या, प्रत्येक पात्र नागरिकाला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी मतदार यादी त्रुटीमुक्त असणे आवश्यक आहे. त्यामुळे घरी येणाऱ्या कर्मचाऱ्यांना नागरिकांनी अचूक माहिती द्यावी आणि आवश्यक कागदपत्रे वेळेत उपलब्ध करून द्यावीत.

चुकीची किंवा अपूर्ण माहिती दिल्यास मतदार यादीतील नोंदींवर परिणाम होऊ शकतो, त्यामुळे माहिती देताना काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले. मतदार यादीबाबत कोणतीही शंका, तक्रार किंवा अडचण असल्यास संबंधित निवडणूक नोंदणी अधिकारी अथवा तहसील कार्यालयाशी संपर्क साधावा, असेही तांबे यांनी स्पष्ट केले.

लोकशाही प्रक्रियेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी मतदार यादी अचूक असणे आवश्यक असून, त्यासाठी प्रशासनाबरोबरच नागरिकांचाही सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले.

## झेंडूला मिळतोय सोन्याचा भाव; किलोला १०० रुपये, उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यात सध्या झेंडूच्या फुलांना सोन्यासारखा बाजारभाव मिळत असून किलोमागे तब्बल १०० रुपये दर मिळत आहे. अनेक महिन्यांपासून कवडीमोल भावामुळे आर्थिक अडचणीत सापडलेल्या झेंडू उत्पादक शेतकऱ्यांना अखेर दिलासा मिळाला असून बाजारभावातील वाढीमुळे समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील रांजणी, थोरांदळे, वळती, नागापूर, शिंगवे, भागडी, पारगाव आदी गावांमध्ये मोठ्या प्रमाणावर झेंडूची लागवड केली जाते. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून झेंडूच्या फुलांना अत्यल्प बाजारभाव मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही वसूल होत नव्हता. रोपे, मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन, औषध फवारणी, मजुरी आणि इतर शेतीखर्चात सातत्याने वाढ होत असतानाही योग्य भाव मिळत नसल्याने शेतकरी चिंतेत होते.

विशेष म्हणजे यात्रा, उत्सव, लग्नसराई, दसरा आणि दिवाळी यांसारख्या सणासुदीच्या काळातही झेंडूच्या दरात अपेक्षित वाढ झाली नव्हती. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी झेंडूच्या लागवडीकडे पाठ फिरवली. परिणामी बाजारपेठेत झेंडूची आवक कमी झाली आणि त्याचा परिणाम म्हणून सध्या बाजारभावात लक्षणीय वाढ झाली आहे.

रांजणी येथील झेंडू उत्पादक शेतकरी बाबासाहेब भोर म्हणाले, सहा महिन्यांपूर्वी झेंडूच्या फुलांना अत्यंत कमी बाजारभाव मिळत होता. त्यामुळे रोपे, मल्चिंग पेपर, ठिबक सिंचन, औषध फवारणी आणि लागवडीचा खर्चही निघत नव्हता. सणासुदीच्या काळातही अपेक्षित दर मिळाला नाही. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी झेंडूच्या लागवडीत घट केली. आता बाजारात आवक कमी झाल्याने झेंडूला किलोमागे १०० रुपयांपर्यंत भाव मिळत असून शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

सध्या रांजणी-थोरांदळे परिसरात झेंडूच्या फुलांची तोडणी वेगाने सुरू असून वाढलेल्या बाजारभावामुळे उत्पादक शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. हा चांगला दर आणखी काही काळ कायम राहावा, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत.

## चिखली-मोशीत एसटी बस स्थानकाच्या हालचाली; परिवहन मंत्र्यांचे सर्वेक्षणाचे आदेश

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** पिंपरी-चिंचवडच्या उत्तर भागातील चिखली किंवा मोशी येथे आधुनिक एसटी बस स्थानक उभारण्याच्या प्रस्तावाला गती मिळाली आहे. भाजप आमदार महेश लांडगे यांच्या पाठपुराव्यानंतर परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाला तातडीने सर्वेक्षण करून प्रस्तावावर पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत.



चिखली, मोशी, चऱ्होली, तळवडे, बोऱ्हाडेवाडी आदी वेगाने विकसित होत असलेल्या परिसरातील नागरिकांना सध्या आंतरजिल्हा प्रवासासाठी शहरातील इतर बस स्थानकांवर अवलंबून राहावे लागत आहे. त्यामुळे नवीन बस स्थानक उभारल्यास प्रवाशांचा वेळ आणि खर्च वाचण्याबरोबरच विद्यमान स्थानकांवरील ताणही कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

महामंडळाकडून तांत्रिक आणि प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच स्थानकाच्या उभारणीबाबत अंतिम निर्णय होणार आहे.

## हातोडी डोक्यात घालून साथीदाराचा खून

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पुणे :** झारखंड येथून कामाला आलेल्या व एका खोली राहणार्या दोघांमध्ये कामावरुन व दारु पिण्यावरुन झालेल्या भांडणात लोखंडी हातोडीने डोक्यात व पाठीत वार करुन साथीदाराचा खुन केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. वाघोली पोलिसांनी सेंट्रींग कामगाराला सातारा येथून अटक केली आहे. शिवशंकर मोहनमाड सिंह (वय ४७, रा. सिन्ना बितुला, लक्ष्मी पार्क, हनुमंत उंद्रेनगर, कोलवडी) असे खुन झालेल्या कामगाराचे नाव आहे. सुरज साव (वय ५०, मुळ रा. रांची) असे अटक केलेल्या कामगाराचे नाव आहे. याबाबत अतुल ज्ञानेश्वर सोनवणे (वय २७, रा. कोलवडी) यांनी वाघोली पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार मांजरी येथील सिन्ना अंकल यांचे फार्म हाऊसवरील खोलीमध्ये १ जुलै रोजी मध्यरात्री साडेबारा ते दीड वाजण्याच्या दरम्यान घडला.

## एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने जाधववाडीत युवा शेतकऱ्याने फुलवली आधुनिक शेती; काकडीनंतर चवळीचेही घेतले भरघोस उत्पादन



■ दैनिक राज्य लोकतंत्र

**पारगाव :** आंबेगाव तालुक्यातील जाधववाडी येथील युवा प्रगतशील शेतकरी संतोष बबन जाधव यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून आधुनिक शेतीचा आदर्श निर्माण केला आहे. एआयच्या सहाय्याने हवामानाचा अचूक अंदाज, संभाव्य किडी व रोगांचा इशारा, खत व्यवस्थापन तसेच औषध फवारणीची योग्य वेळ याबाबत मार्गदर्शन मिळत असल्याने उत्पादनात वाढ झाली असून खर्चातही बचत होत आहे.

संतोष जाधव यांनी यापूर्वी एआय तंत्रज्ञानाच्या मदतीने काकडीचे यशस्वी उत्पादन घेतले होते. त्या अनुभवाच्या बळावर त्यांनी सध्या चवळीची लागवड केली असून या पिकातूनही भरघोस उत्पादन मिळत आहे. योग्य वेळी घेतलेले निर्णय आणि शास्त्रीय पद्धतीने केलेले पीक व्यवस्थापन यामुळे उत्पादनाची गुणवत्ता सुधारली असून बाजारपेठेतही त्यांच्या पिकाला चांगला प्रतिसाद मिळत आहे.

शेतीपुढील बदलते हवामान आणि किडी-रोगांचा वाढता प्रादुर्भाव ही मोठी आव्हाने मानली जातात. मात्र एआय तंत्रज्ञानामुळे मोबाईलवरच हवामानाचा अंदाज, पावसाची पूर्वसूचना, तापमानातील बदल, पिकांवरील रोगांचा संभाव्य धोका, आवश्यक खतांचे प्रमाण तसेच औषध फवारणीची योग्य वेळ याबाबत माहिती उपलब्ध होत असल्याने योग्य वेळी निर्णय घेणे शक्य होत असल्याचे संतोष जाधव यांनी सांगितले.

या तंत्रज्ञानामुळे अनावश्यक फवारणी टळून उत्पादन खर्चात बचत झाली आहे. तसेच पिकांचे संरक्षण अधिक प्रभावीपणे करता आल्याने उत्पादनात वाढ झाली असून आर्थिकदृष्ट्याही चांगला फायदा झाल्याचे त्यांनी नमूद केले.

आजच्या डिजिटल युगात शेतीमध्येही आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करणे आवश्यक असल्याचे सांगताना संतोष जाधव म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता हे भविष्यातील शेतीसाठी अत्यंत उपयुक्त साधन ठरणार आहे. इतर शेतकऱ्यांनीही अशा आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून शेती अधिक फायदेशीर आणि शाश्वत करण्याचा प्रयत्न करावा. आंबेगाव तालुक्यातील युवा शेतकऱ्याचा हा अभिनव प्रयोग परिसरातील इतर शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत असून पारंपरिक शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास शेती अधिक समृद्ध, उत्पादनक्षम आणि शाश्वत होऊ शकते, हे संतोष जाधव यांनी आपल्या कृतीतून सिद्ध करून दाखवले आहे.

## सारांश वृत्त

### अमरावती वैद्यकीय महाविद्यालय प्रकल्प वनमंजुरीच्या अडथळ्यात; वैद्यकीय शिक्षणातील पायाभूत सुविधांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**मुंबई :** देशात वैद्यकीय शिक्षण विस्ताराच्या घोषणा होत असताना प्रत्यक्ष अंमलबजावणीत जमीन, परवानग्या आणि प्रशासकीय मंजुरींच्या अडथळ्यांमुळे प्रकल्प रखडत असल्याचे चित्र अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या प्रकरणातून पुन्हा अधोरेखित झाले आहे.

अमरावती येथे प्रस्तावित शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासाठी आलियाबाद येथील जमीन निश्चित करून ताबा घेण्यात आला असला तरी, ती जागा वनक्षेत्रात येत असल्याचे स्पष्ट झाल्याने संपूर्ण प्रस्ताव केंद्र शासनाच्या मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. यामुळे वैद्यकीय शिक्षण क्षेत्रातील पायाभूत प्रकल्पांना पर्यावरणीय आणि प्रशासकीय मंजुरींच्या गुंतागुंतीचा फटका बसत असल्याचे समोर आले आहे.

विधानसभेत या विषयावर चर्चा झाली असता, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी स्पष्ट केले की, वनविभागाच्या मंजुरीनंतरच अंतिम निर्णय होईल आणि तोपर्यंत जागा बदलणे किंवा पर्यायी व्यवस्था करणे शक्य नाही. या प्रक्रियेमुळे प्रकल्पाच्या अंमलबजावणीत आणखी विलंब होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

राष्ट्रीय वैद्यकीय आयोगाच्या (NMC) निकषांनुसार प्रत्येक वैद्यकीय महाविद्यालयासाठी ५०० खाटांचे रुग्णालय आवश्यक असताना, अनेक राज्यांमध्ये अशा मूलभूत अटी पूर्ण करण्यासाठीच वेळ जात असल्याचे चित्र आहे. परिणामी नवीन वैद्यकीय महाविद्यालयांच्या सुरुवातीच्या टप्प्यातच प्रशासकीय विलंब आणि जमीन-संबंधित अडचणी निर्माण होत आहेत.

राज्यात प्रत्येक जिल्ह्यात वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याचे धोरण जाहीर करण्यात आले असले तरी, प्रत्यक्षात जमीन उपलब्धता, पर्यावरण मंजुरी आणि केंद्र-राज्य समन्वय या मुद्द्यांवर प्रकल्प अडकत असल्याचे वास्तव समोर येत आहे.

# आयुर्वेदाचे जागतिक स्तरावर पुनरुत्थान: वैज्ञानिक पुरावे आणि तंत्रज्ञानाच्या जोरावर आधुनिक परिवर्तनाचा वेध

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** प्राचीन भारतीय वैद्यकशास्त्र असलेल्या आयुर्वेदाला जागतिक स्तरावर वैज्ञानिक मान्यता मिळवून देण्यासाठी देशपातळीवर मोठ्या हालचाली सुरू झाल्या आहेत. नीती आयोग (NITI Aayog), आयुष मंत्रालय (Ministry of AYUSH) आणि केंद्रीय आयुर्वेद संशोधन परिषद (CCRAS) यांच्या संयुक्त विद्यमाने आयुर्वेदाचे आधुनिक परिवर्तन करण्यासाठी एका विशेष आराखड्यावर वेगाने काम करण्यात येत आहे.

२०२६ मधील ताज्या घडामोडींनुसार, या मोहिमेंतर्गत पारंपारिक ज्ञानाला आधुनिक विज्ञानाची जोड देऊन जागतिक आरोग्य क्षेत्रात भारताचे स्थान मजबूत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या परिवर्तनाचे मुख्य धोरणात्मक टप्पे खालीलप्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहेत.

**आधुनिक तंत्रज्ञान आणि वैज्ञानिक संशोधन:** प्राचीन आयुर्वेदिक सूत्रे आणि उपचार पद्धतींचे आधुनिक फार्माकोलॉजी, अद्ययावत वैद्यकीय उपकरणे आणि 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) च्या मदतीने पुनर्मूल्यांकन केले जात आहे. यामुळे आयुर्वेदाला जागतिक पातळीवर स्वीकारार्ह ठरतील असे वैज्ञानिक पुरावे (Evidence-based Research) मिळण्यास मदत होईल.'SMART' उपक्रमद्वारे शैक्षणिक सुधारणा: आयुर्वेद महाविद्यालयांमधील प्राध्यापकांना आणि संशोधकांना क्लिनिकल संशोधनासाठी सक्षम करण्यासाठी 'SMART' (Scope for Mainstreaming Ayutrveda Research in Teaching Professionals) हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम राबवला जात आहे. यामुळे शैक्षणिक पातळीवरच संशोधनाचा दर्जा उंचावणार आहे.

**स्टार्टअप्स आणि नवोपक्रमांना बळ:** आयुर्वेद क्षेत्रात व्यावसायिक क्रांती आणण्यासाठी आणि तरुण उद्योजकांना आकर्षित करण्यासाठी विशेष पावले उचलली जात आहेत. यासाठी 'ASIC' (Ayurveda Swasthya Entrepreneurship and Innovation Centre) सारख्या इनक्यूबेटर्सची स्थापना करण्यात आली असून, याद्वारे नवीन उत्पादनांच्या निर्मितीला आणि स्टार्टअप्सना मोठे प्रोत्साहन दिले जात आहे.

**प्राचीन वारशाचे डिजिटल जतन:** भारताच्या महान आयुर्वेदिक वैद्यांचे जीवनकार्य, त्यांचे योगदान आणि दुर्मिळ प्राचीन ग्रंथांचे भविष्यकाळासाठी जतन करण्यासाठी 'APTA' प्रकल्पाची सुरुवात करण्यात आली आहे.

या अंतर्गत या अमूल्य वारशाचे डिजिटलायझेशन केले जात आहे.एकंदरीत, हे आधुनिक परिवर्तन केवळ उपचार पद्धतीपुरते मर्यादित नसून आरोग्य क्षेत्रातील रोजगाराच्या नव्या संधी, शैक्षणिक विकास आणि जागतिक बाजारपेठेत भारताची मक्तेदारी निर्माण करण्याच्या दृष्टीने टाकलेले एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरत आहे.या क्षेत्रातील पुढील घडामोडी सविस्तर समजून घेण्यासाठी, तुम्हाला खालीलपैकी कोणत्या मुद्द्यावर अधिकृत माहिती किंवा आकडेवारी हवी आहे?

नवीन आयुर्वेदिक स्टार्टअप्ससाठी उपलब्ध असणारे सरकारी निधी आणि अनुदान (GVants)? 'SMART' उपक्रमांतर्गत संशोधकांना मिळणाऱ्या विशेष संधी? आयुर्वेद क्षेत्रात निर्माण होणारे नवीन करिअर पर्याय आणि नोकऱ्या?

# स्टिंग एनर्जी ड्रिंक्सवर राज्य सरकारची कडक कारवाई; शाळांच्या ५०० मीटर परिसरात विक्रीवर बंदी




■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** अल्पवयीन मुलांमध्ये एनर्जी ड्रिंक्सच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या आरोग्यधोक्यांवर नियंत्रण आणण्यासाठी सरकारने कठोर पाऊल उचलले आहे. 'स्टिंग'सह सर्व उच्च-कॅफिनयुक्त एनर्जी ड्रिंक्सची शाळा परिसरातील विक्रीवर निर्बंध घालण्यात आले असून, शाळांच्या ५०० मीटर परिसरात अशा उत्पादनांची विक्री पूर्णतः बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. अधिकाऱ्यांच्या मते, अल्पवयीन विद्यार्थ्यांमध्ये या पेयांचे वाढते सेवन हृदयाचे ठोके वाढणे, झोपेच्या समस्या आणि व्यसनाधीनतेसारख्या आरोग्य समस्यांना कारणीभूत ठरत आहे. त्यामुळे शैक्षणिक संस्थांच्या परिसरात सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण राखण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

नियमांचे उल्लंघन करणाऱ्या दुकानदारांवर कडक दंडात्मक कारवाई तसेच परवाना रद्द करण्याची शक्यता असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. आरोग्य विभाग आणि स्थानिक प्रशासनाला या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## अयोध्या देणगी वादावरून उद्धव ठाकरे यांचा भाजपवर निशाणा; ५ जुलैपासून 'राम रक्षा' आंदोलनाची घोषणा

■ दैनिक राज्य लोकतंत्र



**मुंबई :** अयोध्या राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहाराच्या आरोपांवरून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार टीका करत ५ जुलैपासून महाराष्ट्रभर 'राम रक्षा' आंदोलन सुरू करण्याची घोषणा केली आहे. या आंदोलनाच्या माध्यमातून राम मंदिरातील आर्थिक व्यवहारांबाबत उत्तरदायित्व निश्चित करण्याची मागणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना ठाकरे म्हणाले की, राम मंदिरातील कथित मोठ्या आर्थिक गैरव्यवहारामुळे अनेक रामभक्तांमध्ये नाराजी आहे. या प्रकरणामुळे संतप्त झालेल्या सर्व नागरिकांनी आंदोलनात सहभागी व्हावे आणि भाजपला याबाबत जाब विचारावा, असे आवाहन त्यांनी केले.

ठाकरे यांनी आरोप केला की, राम मंदिराच्या उभारणीसाठी देशभरातील भाविकांनी श्रद्धेने देणग्या दिल्या. त्यामुळे त्या निधीच्या वापराबाबत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व अपेक्षित आहे. या प्रकरणातील आरोपांची निष्पक्ष चौकशी होऊन सत्य जनतेसमोर यावे, अशी मागणीही त्यांनी केली.

दरम्यान, राम मंदिरातील कथित देणगी गैरव्यवहारासंदर्भातील आरोपांवर संबंधित ट्रस्ट किंवा भाजपकडून अधिकृत भूमिका समोर आलेली नाही. या आरोपांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नसून, प्रकरणाबाबत पुढील घडामोडींकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

राजकीय निरीक्षकांच्या मते, आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर धार्मिक आणि जनभावनांशी संबंधित मुद्द्यांवरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोप अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. अशा परिस्थितीत 'राम रक्षा' आंदोलनाला जनतेचा कितपत प्रतिसाद मिळतो आणि सत्ताधारी पक्ष या आरोपांना काय उत्तर देतो, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# धोरणांचा बुस्टर की केवळ घोषणांचा सुकाळ?


## 'कचऱ्यातून संपत्ती' निर्मितीच्या सरकारी दाव्यांमधील वास्तव आणि आव्हाने

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** देशातील बायोगॅस आणि कॉम्प्रेस्ड बायोगॅस (CBG) उत्पादनाला गती देण्यासाठी पेट्रोलियम मंत्रालयाने 'संपूर्ण गोवर्धन योजना' जाहीर केली खरी, परंतु कागदावर अत्यंत महत्त्वाकांक्षी दिसणाऱ्या या योजनेच्या प्रत्यक्ष अंमलबजावणीवर आता तज्ज्ञांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

२०३० पर्यंत देशात तब्बल ५,००० सीबीजी प्रकल्प उभारून वार्षिक १५ दशलक्ष मेट्रिक टन उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. मात्र, जमिनीवरील वास्तव पाहता हे उद्दिष्ट गाठणे सरकारसाठी एक मोठे आव्हान ठरणार असल्याचे स्पष्ट दिसत आहे.या धोरणात्मक घोषणेतील त्रुटी आणि मुख्य आव्हाने खालील मुद्द्यांच्या आधारे समोर येत आहेत:कच्च्या मालाचा विस्कळीत पुरवठा: 'फीडस्टॉक' म्हणजेच कचरा आणि शेणखताचे संकलन, त्याचे वर्गीकरण आणि प्रक्रिया प्रकल्पांपर्यंत वाहतूक करण्यासाठी देशात अजूनही सक्षम साखळी व्यवस्थापन (Supply Chain) उपलब्ध नाही. हा पायाभूत तुटवडा दूर केल्याशिवाय प्रकल्पांची व्यवहार्यता धोक्यातच राहील.

खरेदीची अनिश्चितता आणि बाजारातील स्पर्धा: सीबीजी उत्पादकांना 'खात्रीशीर खरेदी' (Offtake Assurance) देण्याचे आश्वासन




धोरणात असले, तरी पारंपरिक नैसर्गिक गॅसच्या तुलनेत हा गॅस खरेदीदारांसाठी कितपत किफायतशीर ठरेल, याबाबत अद्यापही संभ्रम आहे.

बाजारपेठ सरकारी अनुदानांवर अवलंबून राहिल्यास या प्रकल्पांचे भविष्य अंधारात जाऊ शकते. गुंतवणूकदारांची पाठ आणि कर सवलतींची संथ अंमलबजावणी: संपूर्ण सीबीजी साखळीवर 'जीएसटी' (GST) दर ५% पर्यंत कमी करण्याची केवळ 'शिफारस' करण्यात आली आहे, त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी कधी होणार यावर स्पष्टता नाही.

त्यातच धोरणांमधील वारंवार होणाऱ्या बदलांमुळे मोठे उद्योग या क्षेत्रात प्रचंड भांडवल गुंतवण्यास सध्यातरी धजावत नसल्याचे चित्र आहे. थोडक्यात सांगायचे तर, केवळ सवलतींच्या घोषणा करून किंवा आकर्षक उद्दिष्टे ठेवून हा प्रकल्प यशस्वी होणार नाही, तर नोकरशाहीतील अडथळे दूर करून प्रत्यक्ष अंमलबजावणीचा वेग वाढवणे गरजेचे आहे.

## लक्षद्वीपच्या ८० वर्षीय परिचारिकेची जागतिक पातळीवर दखल; हजारो जीव वाचवणाऱ्या हिंदुम्बी कौरोम कक्काडा 'टॉप १०'मध्ये

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** लक्षद्वीपमधील ८० वर्षीय परिचारिका हिंदुम्बी कौरोम कक्काडा यांना त्यांच्या दीर्घकाळाच्या सेवाभावासाठी जागतिक स्तरावर मोठा सन्मान मिळाला आहे. हजारो रुग्णांचे प्राण वाचवणाऱ्या या अनुभवी परिचारिकेची 'ग्लोबल नर्सिंग अवॉर्ड'साठी जगातील टॉप १० अंतिम स्पर्धकांमध्ये निवड झाली आहे.

लक्षद्वीपसारख्या दुर्गम आणि मर्यादित आरोग्य सुविधा असलेल्या भागात अनेक दशकांपासून त्यांनी आरोग्यसेवा दिली. आपत्कालीन प्रसंगी तत्काळ वैद्यकीय मदत, प्रसूती सेवा आणि ग्रामीण भागातील आरोग्य जागृती यामध्ये त्यांचे योगदान महत्त्वाचे मानले जाते.

मर्यादित साधनसंपत्ती असूनही रुग्णसेवेसाठी केलेल्या अथक प्रयत्नांमुळे त्या स्थानिक समुदायात 'जीव वाचवणारी परिचारिका' म्हणून ओळखल्या जातात. विशेषतः बेटांवरील आरोग्य व्यवस्थेतील अडचणींच्या काळात त्यांनी अनेक प्रसंगांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगितले जाते.

जागतिक स्तरावर मिळालेल्या या सन्मानामुळे लक्षद्वीपच्या आरोग्यसेवेतील समर्पित कर्मचाऱ्यांच्या कार्याची दखल घेतली गेली असून, कक्काडा यांच्या कार्याचा गौरव होत आहे.

## ईडी अधिकाऱ्यांवरील हल्ला : सीबीआय चौकशीची मागणी फेटाळली; केरळ उच्च न्यायालयाचा निर्णय

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**कोची :** ईडी (अंमलबजावणी संचालनालय) अधिकाऱ्यांवरील हल्ल्याप्रकरणी सीबीआय चौकशीचे आदेश द्यावेत, अशी मागणी करणारी याचिका केरळ उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणाच्या तपासात केरळ पोलिसांनी लक्षणीय प्रगती केली असल्याचे न्यायालयाने नमूद करत, सध्या तरी सीबीआय चौकशीचे निर्देश देण्याची आवश्यकता नसल्याचे स्पष्ट केले.




न्यायमूर्तींच्या विभागीय खंडपीठाने याचिकेवरील सुनावणीदरम्यान राज्य पोलिसांचा तपास समाधानकारकपणे सुरू असल्याचे निरीक्षण नोंदवले. त्यामुळे या टप्प्यावर तपास सीबीआयकडे सोपविण्याचे कोणतेही कारण नसल्याचे न्यायालयाने म्हटले.

तथापि, पुढील काळात तपासाच्या अनुषंगाने विशेष परिस्थिती निर्माण झाल्यास किंवा आवश्यक कारणे समोर आल्यास संबंधित पक्षांना कायद्यानुसार योग्य तो दिलासा मागण्याचा मार्ग खुला असल्याचेही न्यायालयाने सूचित केले

# व्हॉट्सॲपनंतर टेलिग्राम व सिग्नलवर केंद्राची नजर; युझरनेम फीचरवरून सायबर सुरक्षेचा गंभीर प्रश्न ऐरणीवर

■ दैनिक राज्य लोकतंत्र

**नवी दिल्ली :** डिजिटल संवादाच्या झपाट्याने वाढणाऱ्या युगात मेसेजिंग ॲप्समधील सुरक्षाविषयक मुद्दे पुन्हा एकदा केंद्रस्थानी आले आहेत. व्हॉट्सॲपला यापूर्वी दिलेल्या इशाऱ्याच्या पार्श्वभूमीवर, आता केंद्र सरकारने टेलिग्राम आणि सिग्नल या दोन लोकप्रिय मेसेजिंग प्लॅटफॉर्म्सना त्यांच्या 'युझरनेम' आधारित संवाद प्रणालीबाबत औपचारिक नोटीस बजावल्याचे समजते.

फोन नंबर न वापरता केवळ युझरनेमच्या आधारे संवाद साधण्याची सुविधा देणाऱ्या या प्रणालीमुळे वापरकर्त्यांची गोपनीयता काही प्रमाणात वाढते, मात्र त्याचबरोबर सायबर गुन्हेगारांना नव्या प्रकारचे मार्ग उपलब्ध होऊ शकतात, अशी गंभीर चिंता अधिकाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आली आहे.

**गोपनीयता विरुद्ध सुरक्षा संघर्ष**

डिजिटल तज्ज्ञांच्या मते, युझरनेम फीचर हे तांत्रिकदृष्ट्या गोपनीयता वाढवणारे साधन आहे. वापरकर्त्याचा फोन नंबर उघड न होता संवाद साधता येतो, हे अनेकांसाठी सुरक्षिततेचे लक्षण मानले जाते. मात्र दुसरीकडे, याच वैशिष्ट्याचा गैरवापर करून बनावट ओळखी तयार करणे, आर्थिक फसवणूक करणे आणि अनोळखी लोकांना लक्ष्य करणे अधिक सोपे होते.

भारतीय समाजात, विशेषतः मोठ्या प्रमाणावर डिजिटल व्यवहार वाढत असताना, फसवणुकीचे प्रकारही अधिक सूक्ष्म आणि धोकादायक होत चालले आहेत. जढ्झ फसवणूक, लिंक-आधारित स्कॅम्स, बनावट नोकरी ऑफर, आणि डिजिटल ब्लॅकमेलिंग यांसारख्या घटनांमध्ये वाढ होत असल्याचे विविध सायबर सेल अहवालांतून समोर आले आहे.

**सरकारची भूमिका आणि प्रश्न**

या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने टेलिग्राम आणि सिग्नलकडे स्पष्टपणे विचारणा केली आहे की, युझरनेम फीचरमुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोका रोखण्यासाठी कोणत्या प्रकारच्या तांत्रिक आणि प्रशासकीय उपाययोजना राबवल्या जात आहेत.

विशेषतः खालील मुद्द्यांवर सरकारने स्पष्टीकरण मागितल्याचे सांगितले जाते

* बनावट ओळखी ओळखण्यासाठी कोणती यंत्रणा आहे?
* सायबर फसवणुकीच्या तक्रारींवर प्लॅटफॉर्म्सची प्रतिक्रिया किती जलद आहे?
* भारतीय कायद्यांनुसार डेटा शेअरिंग आणि तपास यंत्रणांना सहकार्य कसे दिले जाते?

**सिग्नल व टेलिग्रामसमोरील आव्हाने**

ढशश्रशसऑरा आणि डळसपरश्र हे दोन्ही प्लॅटफॉर्म्स जागतिक स्तरावर एंड-टू-एंड एन्क्रिप्शन आणि गोपनीयता धोरणांसाठी ओळखले जातात. मात्र भारतासारख्या मोठ्या वापरकर्ता बाजारपेठेत त्यांच्यावर स्थानिक कायद्यांचे पालन करण्याचा दबाव वाढत आहे.

टेलिग्रामवर पूर्वीही सायबर गुन्हेगारी, अवैध ग्रुप्स आणि आर्थिक फसवणुकीसाठी प्लॅटफॉर्मचा गैरवापर झाल्याच्या तक्रारी आल्या आहेत. तर सिग्नल अधिक सुरक्षित मानला जात असला तरी त्याच्या ओपन आयडेंटिटी मॉडेलमुळे अनोळखी संपर्क वाढण्याची शक्यता तज्ज्ञ व्यक्त करतात.

**डिजिटल सुरक्षिततेचे वाढते आव्हान**

भारतात डिजिटल वापरकर्त्यांची संख्या कोट्यवधींमध्ये पोहोचली असून, ग्रामीण भागातही स्मार्टफोनचा वापर वाढला आहे. मात्र याच विस्तारासोबत सायबर सुरक्षेची जागरूकता तुलनेने कमी असल्याचे निरीक्षण तज्ज्ञांकडून केले जाते.

विशेषतः ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी आणि पहिल्यांदाच डिजिटल व्यवहार करणारे वापरकर्ते हे सायबर फसवणुकीचे प्रमुख लक्ष्य ठरत असल्याचे अनेक अहवालांमध्ये नमूद करण्यात आले आहे.

**संतुलनाची गरज**

या संपूर्ण प्रकरणात मुख्य प्रश्न गोपनीयता आणि सुरक्षा यामधील संतुलनाचा आहे. एकीकडे वापरकर्त्यांना अधिक स्वातंत्र्य आणि गोपनीयता हवी आहे, तर दुसरीकडे राज्याला नागरिकांच्या सुरक्षेची जबाबदारी आहे.

तज्ज्ञांच्या मते, केवळ कठोर निर्बंधांपेक्षा तांत्रिक उपाय, अख-आधारित स्कॅम डिटेक्शन, आणि वापरकर्त्यांचे डिजिटल शिक्षण हे अधिक प्रभावी ठरू शकते.

**पुढील दिशा**

केंद्र सरकार आणि या मेसेजिंग कंपन्यांमधील संवाद पुढील काळात अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. युझरनेम फीचर पूर्णपणे बंद करणे हा उपाय नसून, त्याचा सुरक्षित वापर सुनिश्चित करणे हेच खरे आव्हान असल्याचे मत तज्ज्ञ व्यक्त करत आहेत. दरम्यान, डिजिटल व्यवहार आणि संवाद वाढत असताना, भारतात सायबर सुरक्षेचे कायदेशीर आणि तांत्रिक चौकट अधिक मजबूत करण्याची गरज पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे.